वासनी मध्यम प्रकल्प, तालुका- अचलपुर जिल्हा- अमरावती व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- सुप्रमा-२०२१/(प्र.क्र.२५७/२१)/मप्र**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २१ फेब्रुवारी, २०२३.

**संदर्भ:-**
१) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय क्र. विपाविम/कातां.६/८१३/ वासणी बु./प्रमा/(२५/२००७) दि. १४/०३/२००८.
२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय क्र. विपाविम/कातां.४ ४४/०८)/वासणी/प्रमा/१३ दि. १५/०१/२००९.
३) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपुर यांचे पत्र जा.क्र.२४९८/का तां-४/वासणी सुप्रमा/२०२१ दि. २५/०३/२०२२.

**प्रस्तावना:-**

वासनी मध्यम प्रकल्प, तालुका- अचलपुर जिल्हा-अमरावती येथे सपन नदीवर २७.२८ द.ल.घ.मी. क्षमतेचे धरण बांधणे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्प हा मा. राज्यपाल यांच्या सिंचन अनुशेष अंतर्गत असुन तो विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत अमरावती या प्रदेशांतर्गत आहे. प्रकल्पाव्दारे अमरावती जिल्ह्यामधील अचलपुर, अंजनगाव व दर्यापुर तालुक्यातील ४३१७ हे. क्षेत्र सिंचना खाली आणण्याचे नियोजित आहे.

वासनी मध्यम प्रकल्पास संदर्भ क्र. १ अन्वये रु. १०२.८१ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर अभियांत्रिकी बदल, दरसुचीमधील वाढ तसेच इतर सुटलेल्या तरतुदीमुळे प्रकल्पाच्या किंमती मध्ये वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या प्रथम सुप्रमा प्रस्तावास संदर्भ क्र. २ अन्वये रु. १९७.८२ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

दरम्यानच्या काळात दर सूचीतील वाढ, भूसंपादन किंमतीतील वाढ, संकल्प चित्रातील बदल, इत्यादी कारणांमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर यांचे संदर्भ क्र. ३ अन्वये सन २०१८-१९ चे दरसूची वर आधारीत रुपये ८२६.११ कोटी किंमतीचा व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मान्यतेस्तव शासनास सादर केला आहे. सदर व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्तावास व्ययअग्रक्रम समितीच्या मान्यते करिता सादर करण्यासाठी नियोजन व वित्त विभागाची सहमती प्राप्त करून घेण्या करिता सादर केला असता संबंधीत विभागांनी व्यय अग्रक्रम समितीच्या मान्यते करिता सादर करण्यासाठी सहमती दिली आहे. प्रकल्पाचे लाभव्यय गुणोत्तर ०.७४ येत असून प्रकल्प आर्थिक मापदंडात बसत नाही.

सदर प्रकल्पाची प्रस्तावित व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रूपये ८२६.११ कोटी प्रथम प्रशासकीय मान्यता किंमत रुपये १९७.८२ कोटीच्या तुलनेत रूपये ६२८.२९ कोटीने जास्त आहे.

किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढील प्रमाणे आहेत :-

| **अ.क्र.** | **बाब** | **वाढ (रुपये कोटी)** |
|---|---|---|
| १ | दरसूचीतील बदला मुळे झालेली वाढ | ६३.८९ |
| २ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | २७५.८६ |
| ३ | संकल्पचित्रातील वाढ | ४४.९६ |
| ४ | नविन बाबींचा समावेश केल्याने झालेली वाढ | ६.१९ |
| ५ | इतर कारणां मुळे झोलली वाढ | २३०.६६ |
| | (a) अपु-या तरतुदींमुळे झालेली वाढ (१०८.५४) | |
| | (b) इतर कारणांमुळे झालेली वाढ (१२२.१२) | |
| ६ | अनुषंगिक खर्चात झालेली वाढ | ६.७३ |
| | **एकुण वाढ** | **६२८.२९** |

प्रकल्पाचा संकल्पित एकूण पाणी साठा २२.५९ द.ल.घ.मी. असून एकूण पाणी वापर २७.२८ द.ल.घ.मी. इतका आहे. अमरावती जिल्हया मधील अचलपुर, अंजनगाव व दर्यापुर तालुक्यातील ४३१७ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभहोणार आहे.

सदर प्रस्ताव दि. २२.११.२०२१ रोजीच्या सचिव स्तरावरील उप समितीसमोर सादर करण्यात आला. सचिव स्तरावरील उप समितीने सदर प्रस्ताव नियामक मंडळाच्या मान्यतेनंतर मा. मंत्रीमंडळासमोर सादर करण्यास सहमती दिली. सदर प्रस्ताव दि. १४.०२.२०२२ रोजीच्या विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळासमोर सादर करण्यात आला. नियामक मंडळाचा ठराव क्र. ८२/३ अन्वये प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर सादर करण्यास मान्यता दिली. त्यानुसार दिनांक २९/११/२०२२ रोजीच्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत सदर प्रस्ताव निर्णयार्थ सादर करण्यात आला. मा. मंत्रीमंडळाने बांधकामाची सद्य:स्थिती, किंमत वाढीची कारणमीमांसा इ. बाबींचा परामर्श घेऊन वासनी मध्यम प्रकल्पाच्या सन २०१८-१९ दरसूचीवर आधारित रुपये ८२६.११ **कोटी** किंमतीच्या व्दितीय सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेतलाआहे.

**शासन निर्णय:-**

१. शासनाच्या या निर्णयाव्दारे वासनी मध्यम प्रकल्पाच्या सन २०१८-१९दर सूचीवर आधारित रुपये ८२६.११ कोटी (रुपये आठशे सवीस कोटी अकरा लक्ष फक्त) किंमतीच्या व्दितीय सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी रूपये ८०१.७९ कोटी (रुपये आठशे एक कोटी ऐकोनयेंशी लक्ष फक्त) कामाप्रीत्यर्थ व रुपये २४.३२ कोटी (रुपये चोवीस कोटी बत्तीस लक्ष फक्त) आस्थापना व अनुषंगिक खर्चासाठी तरतूद आहे. उपशीर्षनिहाय तरतुदींचा गोषवारा सोबत जोडण्यात येत आहे.

२. या योजनेस प्रदान केलेली व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता मध्यम प्रकल्प कार्यासनाच्या नोंदवही मध्ये अनुक्रमांक ०४/२०२३ वर नोंदवण्यात आली आहे.

३. सदर प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत व सुधारित प्रशासकीय मान्यता तरतुदीच्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावे.

४. या प्रकल्पाच्या कामावर होणारा खर्च मुख्य लेखाशीर्ष आय-५, ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प यावरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका (०२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर या महामंडळास भाग भांडवली अंशदान (४७०१-एच ७२९) वासणी मध्यम प्रकल्प या शिर्षाखाली टाकावा व त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

५.१ राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी अहवालातील मुद्यांची पुर्तता झाल्याची खातरजमा महामंडळाने करावी.

५.२ वासनी मध्यम प्रकल्प ता. अचलपुर जि. अमरावती प्रकल्पाचा व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव प्रकल्पांतर्गत धरण, सांडवा आगमन व पुच्छ कालवा यांच्या कामात झालेल्या परिमाणातील वाढीमुळे निर्माण झालेल्या रु. ९२.४९ कोटी इतक्या आर्थिक दायित्वास राज्यतांत्रीक सल्लागार समिती मुद्या क्र. २७ (४) सक्षम स्तरावर मान्यता घेण्यात यावी.

५.३ जलसंपदा विभागाने वासनी मध्यम प्रकल्प ता. अचलपुर जि. अमरावती प्रकल्पावर मार्च २०२० अखेर रु. ५७४.८४ कोटी एवढा खर्च झालेला असुन (प्रकल्पाच्या अद्यावत किंमतीच्या ६९.५८%) अद्याप धरणाची र्शीर्ष कामे पुर्ण झालेली नाहीत. तसेच कालवे व बंदिस्त नलिकांची संपुर्ण कामे बाकी आहेत. त्यामुळे वासनी मध्यम प्रकल्प ता. अचलपुर जि. अमरावती प्रकल्पाची शिर्ष कामे प्राधान्याने पुर्ण करण्यात यावी.

५.४ जलसंपदा विभागाने वासनी मध्यम प्रकल्प ता. अचलपुर जि. अमरावती प्रकल्पाच्या बाबतीत रु. २२.१४ कोटी रक्कमेची अतिरिक्त अदायगी झाल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे याबाबत जबाबदारी निश्चितीची कारवाई अंतिम निष्कर्षा पर्यंत करण्यात यावी.

५.५ सर्व आवश्यक वैधानिक व तांत्रिक मान्यता सक्षम स्तरावरुन घेण्याची कार्यवाही महामंडळाने करावी.

५.६ सचिव स्तरीय उपसमितीने नमूद केल्यानुसार सदर प्रकल्पाच्या निविदा प्रक्रीयेत झालेल्या अनियमीततेसंदर्भात कारवाई करण्यात यावी.

५.७ सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन, निधी वितरण अथवा अतिरिक्त खर्च न करण्याची जबाबदारी संपूर्णपणे महामंडळाची महामंडळाची राहील. या संदर्भात जलसंपदा विभागाने प्रचलित शासन निर्णय, नियम, CVC ची मार्गदर्शक तत्वे, वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपद्धती याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे व याची जबाबदारी संपूर्णपणे महामंडळाची राहील.

५.८ सदर प्रकल्पा संदर्भात आधीच्या कालावधीमध्ये जर काही आर्थिक व कार्यपध्दतीत अनियमितता झाल्या असतील, कोणतीही नियम बाह्य कार्यवाही करण्यात आली असेल अथवा ज्यामुळे घोटाळा निर्माण होण्याची शक्यता असेल अशा कोणत्याही बाबींना शासनाने सहमती दिली आहे असे म्हणता येणार नाही व अशी कोणतीही सहमती/मान्यता शासनाने प्रस्तुत प्रकल्पाबाबत दिलेली नाही.

५.९ सदर व्दितीय प्रशासकीय मान्यता म्हणजे अहवालातील तांत्रिक बाबी अथवा निविदा विषयक क्षेत्रिय स्तरावरील निर्णयास किंवा झालेल्या क्षेत्रिय अनियमिततेस मान्यता गृहीत धरली जाणार नाही.

५.१० या प्रकल्पाबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशीची कार्यवाही पूढे चालू राहील. व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

५.११ आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय प्रकल्पात समावेश करण्यात येणार नाही.

५.१२ प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात येवून पाणीसाठ्याचा सिंचनाकरिता जास्तीत जास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करून त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात येईल.

५.१३ प्रकल्पाचे काम नियोजनानुसार पूर्ण करण्यात यावे.

६. सदर शासन निर्णय, नियोजन विभाग, अनौपचारीक संदर्भ क्रमांक १५५/२०२२/का.१४३४ दिनांक - १२/०८/२०२२, तसेच वित्त विभाग, व्यय-१२ कार्यासनाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक २७६/२०२२/व्यय-१२ दिनांक - २४/०८/२०२२ मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक २९/११/२०२२ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांका पासून करण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०२२११६२०२४९८२७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJESH SHRIRAM KALE

Digitally signed by RAJESH SHRIRAM KALE
DN: CN = RAJESH SHRIRAM KALE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = WATER RESOURCE DEPARTMENT
Date: 2023.02.21 16:24:13 +05'30'

**( राजेश काळे )**
शासनाचे अवर सचिव

**सहपत्र :- उपशीर्ष निहाय तरतुदींचा गोषवारा**

**प्रत, सहपत्रांसह :-**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. विरोधीपक्ष नेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई.
५) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग यांचे स्वीयसहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीयसहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव (प्रकल्पसमन्वय), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११) महालेखापाल-१/२ (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर.
१२) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
१३) मुख्य अभियंता (द.व प्र) व सह सचिव यांचे स्वीयसहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) आंतर वित्तसल्लागार व सह सचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती.
१६) उपसचिव (मो.प्र-१/ मो.प्र-२/जसं/निवसं/सिंव्य/लाक्षेवि/लपा/जवि), यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती.
१८) कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती.
१९) वित्तविभाग ( व्यय-१२/ अर्थ-०२/अर्थ-१०/व्यय-६ अ ), मंत्रालय, मुंबई.
२०) नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई.
२१) मध्यम प्रकल्प कार्यासन संग्रहार्थ.

उपशीर्ष निहाय तरतुदींचा गोषवारा
वासनी मध्यम प्रकल्प,तालुका-अचलपुर जिल्हा-अमरावती
शासन निर्णय क्रमांक :- सुप्रमा-२०२१/६०७/(प्र.क्र.२५७/२१)/मप्र
दिनांक - २१/०२/२०२३ चे सहपत्र.

**(किंमत रुपये कोटी)**

| अ.क्र. | उपशिर्ष | प्रथम सु.प्र.मा. नुसार | व्दितीय सुप्रमानुसार | वाढ/घट (+ / -) |
|---|---|---|---|---|
| (अ) शिर्षकामे | | | | |
| १ | अ-प्राथमिक | ०.४० | ०.४० | ०.०० |
| २ | ब-भूसंपादन | १८.७८ | ३०२.०८ | २८३.३० |
| | I. भुसंपादन | १५.५७ | २७६.५२ | २६०.९५ |
| | II. पुनर्वसन | ३.२१ | २५.५६ | २२.३५ |
| ३ | सी-मुख्य कामे | १२८.११ | ३४३.७६ | २१५.६५ |
| ४ | **डी** - विमोचक | १.७० | २.६९ | ०.९९ |
| ५ | के- इमारती | ०.१० | ०.१५ | ०.०५ |
| ६ | एम - वृक्ष संवर्धन | ०.३२ | ३.४९ | ३.१७ |
| ७ | ओ - संकिर्ण | २.६० | १.७३ | -०.८७ |
| ८ | पी- देखभालवदुरुस्ती | १.०२ | २.८६ | १.८४ |
| ९ | आर- दळणवळण | ०.२४ | १.७२ | १.४८ |
| १० | एक्स-पर्यावरण | ०.२५ | ०.३६ | ०.११ |
| | एकूण (अ) | १५३.५२ | ६५९.२४ | ५०५.७२ |
| (ब) कालवा वितरण प्रणाली | | | | |
| १ | अ-प्राथमिक | ०.६२ | ०.६२ | ०० |
| २ | ब-भूसंपादन | १.९२ | ०० | -१.९२ |
| ३ | **डी** - विमोचक | ०.३३ | ०० | -०.३२ |
| ३ | इ- प्रपात | ०० | ०० | ०० |
| ४ | एफ़ - RHT वर्कस | ५.३५ | ०० | -५.३५ |
| ५ | जी - पुल | ०.७१ | ०० | -०.७१ |

| **अ.क्र.** | **उपशिर्ष** | **प्रथम सु.प्र.मा. नुसार** | **व्दितीय सुप्रमानुसार** | **वाढ/घट (+ / -)** |
|---|---|---|---|---|
| ६ | एच - इस्केप | ०.४८ | ०० | -०.४८ |
| ७ | के- इमारती | ०० | ०० | ०० |
| ७ | एल - मातीकाम | ५.३७ | ०० | -५.३७ |
| ९ | एम - वृक्षारोपण | ०.०४ | ०.३५ | ०.३१ |
| १० | ओ - संकिर्ण | ०.२४ | २.७५ | २.५१ |
| ११ | पी- देखभालवदुरुस्ती | ०.११ | १.०४ | ०.९४ |
| १२ | आर- दळणवळण | ०.११ | ०.२० | ०.०९ |
| | एकूण (ब) | १५.२७ | ४.९६ | -१०.३१ |
| १३ | यु-वितरीका भाग - ३ (PDN) (क) | ११.४५ | १३७.५९ | १२६.१४ |
| | एकूण ब + क | २६.७२ | १४२.५५ | ११५.८३ |
| | एकूण अ + ब + क | १८०.२३ | ८०१.७९ | ६२१.५६ |
| १ | अनुषंगिक खर्च | १७.५९ | २४.३२ | ६.७३ |
| एकूण किंमत: | | १९७.८२ | ८२६.११ | ६२८.२९ |

**ठळक बाबी**

अ) या योजनेचे सिंचन क्षेत्र (ICA) ४२८१ हेक्टर आहे.

ब) लाभव्यय गुणोत्तर - ०.६४< १.५

क) आर्थिक परतावा दर (ERR) - ७.४०< १२ %

RAJESH SHRIRAM KALE

Digitally signed by RAJESH SHRIRAM KALE
DN: CN = RAJESH SHRIRAM KALE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = WATER RESOURCE DEPARTMENT
Date: 2023.02.21 16:24:36 +05'30'

**( राजेश काळे )**

शासनाचे अवर सचिव